# - प्रेस नोट -

दि. २९/०९/२०२६

## चेंबूर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.२७/०९/२०२६ रोजी १७.०० वाजताच्या सुमारास महिला फिर्यादी वय-४० वर्षे, धंदा-घरकाम, रा.ठी. संजयनगर को.ऑ.हौ. सोसायटी, सुभाषनगर, चेंबूर, मुंबई यांचा मुलगा दिनेश उमेश खत्री, वय- २२ वर्षे याला टाक पोर्क मटन शॉप, संजयनगर को.ऑ.हौ. सोसायटीच्या समोर, सुभाषनगर, चेंबूर, मुंबई येथे अटक आरोपी पुरुष वय -२७ वर्षे याने एरियातील भाई बनण्याच्या कारणावरून त्याच्याशी वाद घालून शिवीगाळ करून त्याला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या डोक्यात लाकडी बांबूने मारहाण करून गंभीर दुखापत केली म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.२८/०९/२०२६ रोजी गु.र.क्र.१२१२/२६, कलम १०९(१), ११८(२), ३५१(३), ३५२ बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------